थोडक्यात

'गर्भपातांच्या अर्जांबाबत समिती स्थापन करा'

मुंबई : गेल्या काही महिन्यांत आमच्यासमोर वैद्यकीयदृष्ट्या गर्भपात करण्यास परवानगी मागणाऱ्या अनेक याचिका आल्या आहेत. अशा याचिका वारंवार येत असतील तर राज्य सरकारच याप्रश्नी एक कायमस्वरूपी समिती स्थापन का करत नाही, असा संतप्त सवाल करत याविषयी गांभीर्याने विचार करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी सरकारला दिले.

तिघांना जीवनदान

मुंबई : मुंबईतील हिंदुजा रुग्णालयामध्ये मंगळवारी २३ वर्षीय मेंदूमृत झालेल्या मुलाच्या कुटुंबीयांनी अवयवदान करण्याचा निर्णय घेतल्यामुळे तिघांना जीवदान मिळाले आहे. मेंदूमृत झालेल्या तेवीस वर्षीय तरुणाला मेंदूचा आजार होता. त्याची प्रकृती खालावत जाऊन तो मेंदूमृत अवस्थेमध्ये गेला. मेंदूमृत घोषित केल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांना अवयवदानाबाबत माहिती दिली होती.

'प्रदूषण रोखण्यात रस नाही'

मुंबई : नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत आवश्यक उपाय करण्यात राज्य सरकारला स्वारस्य असल्याचे दिसत नाही, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच सरकारला फटकारले. तसे नद्यांचे जतन-संवधर्न करण्याविषयी सरकारने पावले उचलली नाही तर आम्ही यासंदर्भात आदेश देऊ, असे संकेतही न्यायालयाने दिले. 'राज्यभरातील अनेक नद्यांमध्ये सांडपाणी व रासायिक द्रव्ये सोडली जात असल्याने नद्या प्रदूषित होत आहेत. यामुळे नद्यांचे भवितव्य धोक्यात आहे', अशी चिंता व्यक्त करणारी जनहित याचिका 'वनशक्ती' या स्वयंसेवी संस्थेने केली आहे.

एटीएम फोडणारा मनोरुग्ण

औरंगाबाद : एकाच दिवसात तीन ठिकाणी एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयित आरोपीला पकडण्यात अखेर गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. सीसी टीव्ही आधारे शोध घेऊन पोलिसांनी लखन उर्फ प्रदिप वानखेडे (रा. छोटा मुरलीधरनगर) याला शुक्रवारी ताब्यात घेतले.

राधानगरी 'ओव्हर फ्लो'

धरणातून साडेचार हजार क्युसेक्स विसर्ग सुरू

म. टा. वृत्तसेवा, राधानगरी

राधानगरी येथील लक्ष्मी जलाशय पूर्ण क्षमतेने भरला आहे. जलाशयात ८.३६ टीएमसी पाणीसाठा झाला असून स्वयंचलित दरवाजे उघडले आहेत. पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू असल्याने पाणीपातळीत वाढ होत आहे. शुक्रवारी दुपारी तीन वाजता धरणाचे दोन स्वयंचलित दरवाजे उघडले. भोगावती पात्रात साडेचार हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे.

गेल्या वर्षीपेक्षा यंदा एक महिना आधीच धरण भरले आहे. शुक्रवारी सकाळपर्यंतच्या चोवीस तासात ७३ मिलीमीटर पाऊस झाला आहे तर धरणक्षेत्रात एकूण २९१३ मिलीमीटर पाऊस नोंदला आहे. शुक्रवारी दुपारी तीन वाजता जलाशय स्वयंचलित दरवाजा क्रमांक तीन व त्यापाठोपाठ सहा क्रमांकाचा दरवाजा उघडला. स्वयंचलित दरवाज्यातून २८३६ क्युसेक्स आणि वीजगृहातून १६००क्युसेक्स असा एकूण ४४५६ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. यामुळे भोगावती आणि पंचगंगा नदीच्या पुराच्या पातळीत पुन्हा वाढ होत आहे. भोगावती नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, राधानगरी धरण यावर्षी लवकर भरले आहे. गेल्यावर्षी पाण्याचे योग्य नियोजन करण्यात आले. जुलै महिन्यात वीजगृहातून पाण्याचा विसर्ग वाढवला. त्यामुळे गेले दहा दिवस गंभीर पूरस्थिती निर्माण झाली नाही. यावर्षीही पाण्याच्या विसर्गाचे नियोजन आमची यंत्रणा करीत आहे' असे राधानगरीचे सहायक अभियंता रोहित बांदिवडेकर यांनी सांगितले. तर 'कोल्हापूर जिल्ह्यातील पाणी प्रश्न आणि सिंचनाचा प्रश्न राधानगरी धरणामुळे मार्गी लागला आहे. या वर्षीही धरण प्रशासनाकडून पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे केले जाणार आहे असे कालवा निरीक्षक प्रकाश पाटील यांनी सांगितले.

धरणक्षेत्रात सुरू असलेल्या संततधारेमुळे राधानगरी धरणाचे दोन स्वयंचलित दरवाजे शुक्रवारी उघडले.

भायखळा तुरुंगातील महिला कैद्यांना विषबाधा

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

अधूनमधून प्रकाशझोतात येणारे भायखळा कारागृह शुक्रवारी पुन्हा चर्चेत आले. या कारागृहातील अनेक महिला कैद्यांना रात्री जेवणानंतर अस्वस्थ वाटू लागले. मळमळ उलट्या सुरू झाल्या. ३१२ महिला कैद्यांपैकी ८१ जणींची प्रकृती खालावल्याने त्यांना जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. या कैद्यांना पाणी, अन्न की जेवणानंतर देण्यात आलेली कॉलराची गोळी बाधली असल्याचे डॉक्टरांच्या अहवालानंतर स्पष्ट होईल, अशी माहिती विशेष पोलिस महानिरीक्षक राजवर्धन सिन्हा यांनी दिली.

भायखळा येथील कारागृहात महिला आणि पुरुष कैद्यांना स्वतंत्र ठेवण्याची व्यवस्था आहे. तीन पुरुष कैद्यांची प्रकृती बिघडल्याने १५ जुलै रोजी त्यांना जे. जे. रुग्णालयात तपासणीसाठी नेण्यात आले. डॉक्टरांनी दिलेल्या वैद्यकीय अहवालात या तिघांना गॅस्ट्रोची लागण झाल्याने स्पष्ट झाले. तर तिघांपैकी एकाला कॉलराची लागण झाल्याचे तपासणीतून समोर आले. याबाबत तुरुंग प्रशासनाने महापालिकेच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. पालिकेच्या इ वॉर्डच्या अधिकाऱ्यांनी तुरुंगात जाऊन पाहणी केली.

कॉलराची लागण इतर कैद्यांना होऊ नये यासाठी डॉक्टरांनी सावधगिरी म्हणून गोळ्या देण्याचा सल्ला दिला. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी डॉक्सीसायक्लीन-१०० एमजी या गोळ्यांचा साठा भायखळा कारागृहाला पुरविला. ३१२ महिला कैदी, ३९९ पुरुष कैदी, कारागृहातील अधिकारी, कर्मचारी तसेच कारागृहाच्या आवारात असलेल्या वसाहतींमध्ये या गोळ्या वाटण्यात आल्या. गुरुवारी रात्री जेवण आटोपल्यानंतर सर्वच कैद्यांनी या गोळ्या घेतल्या. काही वेळाने अनेकांना मळमळ, उलट्या सुरू झाल्या. काही महिला कैदी अस्वस्थ जाणवत असल्याच्या तक्रारी करू लागल्या. कारागृह प्रशासनाने या संदर्भातील माहिती देतात जे. जे. रुग्णालयातील डॉक्टरांची टीम कारागृहात पोहचली. प्रकृती बिघडलेल्या कैद्यांवर डॉक्टरांनी उपचार केले. मात्र, सकाळी यातील काही महिला कैद्यांची प्रकृती अधिकच बिघडू लागली. बराक क्रमांक एकमधील महिला कैद्यांना अधिक त्रास जाणवू लागला. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने ८१ महिला कैद्यांना शुक्रवारी सकाळी जेजे रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.

बीडमध्ये सर्वत्र ठोक मोर्चास पाठिंबा

म. टा. प्रतिनिधी, बीड

परळीत मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी सुरू असलेल्या ठोक मोर्चास जिल्हाभर पाठिंबा वाढत आहे. शुक्रवारी माजलगाव शहरातील परभणी फाटा या ठिकाणी सुमारे दोन तास आक्रमक स्वरूपात ठिय्या आंदोलन केले. यावेळी अनेक आंदोलकांनी मुंडन करून सरकार विरोधी रोष व्यक्त केला. यावेळी एका खासगी वाहनांच्या काचा देखील फोडण्यात आल्या. बंदोबस्तातील पोलिस कर्मचाऱ्यांसोबत आंदोलनकर्त्यांचे शाब्दिक चकमक झाल्याने आंदोलन चिघळले. यात अनेक वाहनांवर दगड फेकण्यात आली.

या आंदोलनात माजी मंत्री प्रकाश सोळंके, सभापती अशोक डक, जयदत्त नरवडे, मिलिंद आव्हाड, राजेंद्र होके, कचरू खळगे यांच्यासह नगरसेवक, मराठा समाजासह इतर समाज बांधव देखील मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. धारूर शहरातील शिवाजी चौकात दोन तास रस्ता रोको करण्यात आले. आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा देण्यात आल्या. या वेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

धारूर तालुक्यातील परळी बीड रस्त्यावर तेलगाव येथे मराठा समाजाला आरक्षण द्यावे या मागणीसाठी दोन तास चक्काजाम आंदोलन करण्यात आले. यावेळी तेलगाव परिसरातील, कारी, भोपा, कोथिंबीरवाडी, बाभळगाव, लोनवल, हिगंणी मोहखेड व परिसरातील हजारो मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याचबरोबर अंबाजोगाई, केज, गेवराई, पाटोदा, पिंपळनेर येथेही आंदोलन करण्यात आले.

तीन बसवर दगडफेक

परळीहून-धर्मापुरीकडे जाणाऱ्या एसटी बसवर अज्ञातांकडून शुक्रवारी सकाळी दगडफेक करण्यात आली. परळी धर्मापुरी ही बस धर्मापुरीकडे जात असताना ही घटना घडली. दगडफेकीमध्ये बसच्या सगळ्या काचा फुटल्या असून नुकसान झाले आहे. तर धर्मापुरी फाट्याजवळ पंढरपूर-गंगाखेड या गाडीवरही अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली.

बुडणाऱ्या आठ जणांना वाचवले

वारणा नदीवरील बोट अचानक बंद पडल्यानंतरचे नाट्य

हातकणंगले : कोल्हापूर-सांगली जिल्ह्यांना जोडणाऱ्या वारणा नदीवरील निलेवाडी-ऐतवडे खुर्द पुलाजवळ पुराच्या पाण्यात बोटीचे प्रात्यक्षिक सुरू असताना बोटीत अचानक बिघाड झाला. त्यामुळे बोट सैरावैरा वाहून जाणार तोच निलेवाडीतील आपत्ती नियंत्रण कक्षातील प्रशिक्षित युवकांनी जिवाची तमा न बाळगता केलेल्या मदतीने बोटीतील आठ जण सुखरूप बचावले.

ही घटना निलेवाडी येथील वारणा नदीपात्रात शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली. वाळवा तालुक्यातील ऐतवडे खुर्द येथील आपत्ती निवारणच्या बोटीचे प्रात्यक्षिक घेण्यासाठी प्रशांत पाटील, ओंकार पाटील, प्रणव पाटील, राहुल पाटील, ह्रषिकेश लोहार, चंदू मिस्त्री, वैभव माळी व अन्य एकजण असे आठ युवक ऐतवडे खुर्दच्या बाजूने वारणेच्या पुराच्या पाण्यातून बोटीमधून निलेवाडीच्या दिशेने येत असताना अचानक बोट बंद पडली.

"हेयर फॉलचा# झाला शेवट धन्यवाद केश किंग"

'मी स्वभावाने चंचल आणि खोडकर आहे. पण काही वर्षांपूर्वी माझ्या ह्या आनंदी स्वभावाला जसंकाही ग्रहण लागले. ह्याचे कारण होते दिवसेंदिवस माझे गळणारे केस.

हे माझ नशीब होतं की तेव्हांच मला **केश किंग** बद्दल कळले. तेव्हांपासूनच मी **केश किंग आयुर्वेदिक तेल** आणि शॅम्पू वापरते आहे.

माझे केस गळणे# कमी तर झालेच पण सोबत केस उगवायलाही लागले. माझे केस पूर्वीपेक्षा जास्तं लांब, मऊ, दाट आणि नैसर्गिकरीत्या काळे झालेत. माझा तो चंचलपणा परत आणण्यासाठी आणि माझ्या केसांना, नवं जीवनदान देण्यासाठी धन्यवाद केश किंग.'

केश किंगच्या परिवाराशी जोडलेली आणखी एक शौकीन
कंचन वैष्णव, जयपूर

सर्वोत्तम परिणाम मिळवण्यासाठी आठवड्यातून तीन दिवस, तीन महिने वापरा.

5 समस्यांचा एक आयुर्वेदिक उपाय
- केस गळणे#
- कोंडा^
- कोरडेपणा
- दोन तोंडी केस~
- कमकुवत केस

emami Kesh King THE KING OF OILS

24X7 Toll Free Helpline No.: 1800 103 5155
www.keshking.com /Kesh King Hair Oil

**100 मिली. केश किंग आयुर्वेदिक ऑइल सोबत मिळवा ₹32/- किंमतीचे (सर्व कर समावेश आहे) 8 मिली. $झंडु बाम मोफत। ही ऑफर स्टॉक संपेपर्यंत उपलब्ध आहे. #15 दिवसांच्या वापरानंतर 2017 - 18 मधे केलेल्या क्लिनिकल स्टडीजच्या परिणामांवर आधारित. ^कोंडा निर्माण करणाऱ्या जीवनाणूंच्या इन-विट्रो स्टडीवर आधारित. ~दोन तोंडी केस रोखण्यासाठी रोज वापर करा.

फर्स्ट डे फर्स्ट शो

नकलेचा खेळखंडोबा

जयदीप पाठकजी
Jaydeep.Pathakji@Timesgroup.com

चित्रपटाचे नाव : धडक
निर्माते : करण जोहर, हिरू यश जोहर, अपूर्व मेहता
लेखक, दिग्दर्शक : शशांक खेतान
मूळ कथा : नागराज मंजुळे
संगीत : अजय-अतुल
छायांकन : विष्णू राव
कलाकार : ईशान खट्टर, जान्हवी कपूर, आशुतोष राणा, ऐश्वर्या नारकर
दर्जा : ★★☆☆☆

एखाद्या चित्रपटाचा 'रीमेक' काढताना मूळ चित्रपटाचा आशय तोच ठेऊन एका नव्या मांडणीमध्ये सिनेमाची गोष्ट प्रेक्षकांपुढे आणण्याची एक प्रचलित पद्धत आपल्याकडे आहे. म्हणजे 'रीमेक'च्या नावाखाली मूळ सिनेमाची पुरती वाट लावून भलताच सिनेमा निर्माण करण्याचे प्रकारही आपल्याकडे घडतातच; पण तरीही 'रीमेक' करताना मूळ कलाकृतीचा आत्मा तोच राहावा, अशी अपेक्षा असते. नागराज मंजुळेंच्या गाजलेल्या 'सैराट'चा 'रीमेक' करताना मात्र 'सैराट'मधील निर्माता-दिग्दर्शकाला हव्या असलेल्या आवश्यक तेवढ्याच गोष्टी उचलल्या जातात आणि त्यानंतर एक टिपिकल लव्ह स्टोरी पडद्यावर साकारली जाते. 'सैराट' ही काही फक्त प्रेमकथा नव्हती. समाजातील जातिव्यवस्था, त्यातील अंडरकरंट्स, प्रतिगामी मानसिकता असे अनेक मुद्दे दिग्दर्शकाने 'सैराट'मध्ये अधोरेखित केले होते. ऑनर किलिंगचं वास्तव दाखवतानाच अनेक गोष्टींवर दिग्दर्शकाने भाष्य केले होते. दुर्दैवाने 'धडक'मध्ये यातलं काहीही येत नाही. ज्यांनी 'सैराट' पाहिलाच नाही अशा प्रेक्षकांना 'धडक' आवडू शकतो. एक स्वतंत्र सिनेमा म्हणूनही त्याकडे पाहायचं म्हटलं आणि 'सैराट'शी तुलना करायची नाही असं जरी ठरवलं तरीही 'धडक' प्रेक्षकाला खिळवून ठेऊ शकत नाही.

'सैराट'ची गोष्ट 'धडक'मध्ये येताना थेट राजस्थानातील उदयपूरमध्ये पोहोचते. राजघराण्याची पार्श्वभूमी असलेल्या पार्थवीला (जान्हवी कपूर) राजघराण्याचे नियम, बंधने मान्य नाहीत. तिला निर्णयस्वातंत्र्य हवं आहे; पण पार्थवीचे वडील ठाकूर रतनसिंह (आशुतोष राणा) कडक शिस्तीचे असून राजकारणात सक्रिय आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांना सत्ता हस्तगत करायची आहे. कॉलेजमध्ये शिकणारी पार्थवी मधुकरच्या (ईशान खट्टर) प्रेमात पडते. मात्र, जातीच्या भींती या दोघांमध्ये उभ्या आहेत. रतनसिंह यांच्या कुटुंबापासून दूर राहा, असं ईशानच्या वडिलांनी बजावूनही या दोघांमध्ये प्रेमाचं नातं फुलत जातं. मग 'सैराट'प्रमाणे मधुकरचे दोन जिगरी दोस्त आहेत, पार्थवीची एक मैत्रीण आहे, उदयपूरच्या राजवाड्यांभोवती असलेल्या तलावांमध्ये पोहण्यासाठी मारलेल्या उड्या आहेत आणि 'अंग्रेजी समझता है ना तू' असा नायिकेचा डायलॉगही आहे. हा सारा प्रेमपट अगदी 'सैराट'च्या लाइनवरून जातो, तिथे शेवटी जे आर्ची-परश्याच्या वाट्याला येतं तेच या दोघांच्याही येतं, हे वेगळं सांगायची गरज नाही. (त्यात थोडा बदल आहे; पण तोदेखील काही तरी बदल हवा याच अट्टाहासातून!)

सिनेमाची गोष्ट एकदम उच्चभ्रू धरांमध्ये घडत असल्यामुळे सिनेमाचा आत्माच हरवतो. पार्थवी आणि मधुकर यांच्यातील फुललेले प्रेमही अगदी उरकल्याप्रमाणेच दाखवले जाते. राजस्थानच्या राजकारणाचे धावते संदर्भ येतात; पण तेदेखील तोंडी लावण्यापुरतेच. राजस्थान आणि उत्तरेकडच्या इतर राज्यांमध्ये असलेलं 'ऑनर किलिंग'चं वास्तव, हकनाक जाणारे बळी आदींचा उल्लेख फक्त सिनेमाच्या शेवटी येणाऱ्या उल्लेखापुरताच. त्याबद्दल लेखक काहीच बोलत नाही. मधुकर आणि पार्थवी यांच्यात असलेली सामाजिक दरी कोठेही जाणवत नाही. मधुकरच्या वडिलांचे उदयपूरमध्ये मस्तपैकी 'लेक रेस्टॉरंट' असून, तसा तो खात्यापित्या घरचा दाखवला जातो. त्यामुळे तो संघर्ष इथे रंगत नाही. उदयपूरवरून मुंबई, तेथून नागपूर आणि त्यानंतर कोलकाता अशी स्थलदर्शक सफर घडते. कोलकात्यात एका ओळखीने शेफची नोकरी मागायला गेलेला मधुकर नाइलाज म्हणून वेटरची नोकरी स्वीकारतो, तर पार्थवी 'जस्ट डायल'मध्ये नोकरी करू लागते. या सगळ्या गोष्टीला बंगाली कथानकाची पार्श्वभूमी चिकटवली जाते आणि सिनेमाचा लूक बदलण्याचा प्रयत्न केला जातो. आधी उदयपूर आणि मग कोलकाता दाखवलं जातं. आखीव रेखीव फ्रेम्स, 'गुडी गुडी' वातावरण दाखवून तुम्ही करण जोहरचा सिनेमा पाहत आहात, हे तुमच्या मनावर वारंवार ठसवलं जातं. 'सैराट'मध्ये असलेला साधेपणा, वास्तववादी आयुष्य यांच्याशी फारकत घेतल्यामुळे सिनेमातली सगळी गंमत निघून जाते. तो 'रॉनेस' हाच 'सैराट'चा प्लस पॉइंट होता. 'सैराट'शी तुलना करायची नाही, असं जरी ठरवलं तरीही 'धडक' 'सैराट'हून वेगळा राहू शकत नाही. एक स्वतंत्र सिनेमा म्हणूनही प्रेक्षकाला खिळवून ठेवण्यासारखं 'धडक'मध्ये काहीही नाही. मधुकर आणि त्याच्या मित्रांचे प्रसंग रंगत नाहीत आणि सिनेमा काहीसा संथही होतो. सिनेमाची लांबी अनावश्यक वाढत जाते. उदयपूरमधून पळून गेल्यानंतर मधुकर-पार्थवीने आयुष्याशी केलेला संघर्ष आणखी टोकदार हवा होता. दुर्दैवाने यातलं काहीच होत नाही. आता हा सिनेमा म्हणजे 'ऑनर किलिंग' अशी समजूत करून घेणाऱ्या प्रेक्षकांना 'धडक' ग्रेट वाटू शकतो. अजय-अतुल यांची 'सैराट'ची गाणी हिंदीतून ऐकवली जातात. ईशान खट्टर चांगला अभिनय करतो. जान्हवी कपूरचे नवखेपण अनेक प्रसंगात जाणवते. ती म्हणावीशी प्रभावी वाटत नाही. आशुतोष राणा, अंकित बिश्त, श्रीधर वस्तार यांची कामे प्रसंगानुरूप. छोट्याशा भूमिकेत ऐश्वर्या नारकर लक्षात राहते. थोडक्यात काय, तर 'सैराट' पाहिलेल्यांनी 'धडक'च्या वाट्याला जाऊ नये. ही नक्कल 'अस्सल' नाहीच; पण तिचा पुरता खेळखंडोबा झाला आहे.

बजाज फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: आकुर्डी, पुणे 411035
कॉर्पोरेट कार्यालय: चौथा मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे अहमदनगर रोडच्या पलीकडे, विमान नगर, पुणे - 411014

मुदत ठेव योजना

CRISIL चे 'FAAA/स्टेबल' पतमानांकन आणि ICRA चे 'MAAA (स्टेबल)' CRISIL चे 'FAAA/स्टेबल' पतमानांकन आणि ICRA चे 'MAAA (स्टेबल)' पतमानांकन विशिष्ट साधनावरील मुद्दल आणि व्याजाच्या संदर्भातील सुरक्षेची सर्वोच्च श्रेणी दर्शवतात.

वार्षिक व्याजदर रु. 5 कोटीपर्यंत वैध

कालावधी महिन्यांत	किमान ठेव (रु.मध्ये)	संचित	असंचित			
			मासिक	तिमाही	अर्धवार्षिक	वार्षिक
12 - 23	25,000	7.60%	7.35%	7.39%	7.46%	7.60%
24 - 35		8.15%	7.88%	7.93%	8.00%	8.15%
36 - 60		8.40%	8.13%	8.18%	8.25%	8.40%
विशेष कालावधी योजना						
15	1,00,000	7.85%	7.60%	7.64%	7.71%	7.85%

[illegible]

पुणे
19 जुलै 2018